# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

****************************************************************************************

वाचा : १.महाराष्ट्र शासन पत्र क्र.संकीर्ण-२००७/२९८/प्र.क्र.४१/०७//२० ब दि.१८.०५.२००७

२. कार्यकारी परिषदेचा ठराव क्र.का-४८/२०९/१६.०२.२०२३

---

" एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी पुढील दोन वर्षाची मुदत देणे व तोपर्यंत वसुली न करणेबाबत .

## परिपत्रक

क्रमांक: २०२२/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८ /1452

दिनांक : २७/०३/२०२३

प्रकरणी सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना याव्दारे कळविण्यात येते की, वरील वाचा येथील संदर्भीय शासन निर्णय १९७६ मधील तरतुदीनुसार शासन सेवेत रुजु झाल्यानंतर जर माध्यमिक शांलात परिक्षेत मराठी / हिंदी भाषा उतीर्ण नसेल तर सेवेत रुजु झाल्यानंतर तीन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, तथापी, जे कर्मचारी विहीत मुदतीत किंवा त्यांच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण होईपर्यंत या परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत, त्यांची वार्षिक वेतनवाढ उक्त मुदत संपल्यानंतर ही परीक्षा उत्तीर्ण होईपर्यन्त किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे सूट मिळेपर्यन्त रोखण्यात येईल,अशी रोखून धरण्यात आलेली वार्षिक वेतनावाढ शासकीय कर्मचारी ज्या दिनांकास परीक्षा उत्तीर्ण होतील किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण होतील त्या दिनांकापासून त्यांना देय होईल. मात्र वेतनवाढ रोखून ठेवल्यामुळे कर्मचाऱ्यांना ज्या प्रत्यक्ष वेतनास मुकावे लागले त्याची थकबाकी मिळण्याचा हक्क राहणार नाही.

परंतु बरेच विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी हे या तरदूरीपासून अनभिज्ञ असल्याचे नमूद करून वसुली न करता हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्याकरीता दोन वर्षाची संधी द्यावी अशी विनंती सामुहीक निवदेनाव्दारे केलेली आहे. त्यामुळे मराठी / हिंदी भाषा परिक्षा उतीर्ण होण्यासाठी विशेष संधी देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १६/०२/२०२३ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेच्या पटलावर ठेवण्यात आला असता कार्यकारी परिषदेने सदर प्रस्ताव स्विकारून ठराव क्र.का-४८/२०९/१६.०२.२०२३ समंत केलेला आहे.

**सबब,** वरील कार्यकारी परिषदेच्या मंजूर ठरावानुसार विद्यापीठ सेवेत रूजू झालेले अधिकारी/कर्मचारी माध्यमिक शांलात परिक्षेत मराठी / हिंदी भाषा उतीर्ण नसतील किंवा उक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे सूट मिळालेली नसेल अशा विद्यापीठ अधिकारी / कर्मचारी यांना मराठी / हिंदी भाषा उतीर्ण होण्यासाठी या कॅलेंडर वर्षापासून पुढील दोन वर्षाची संधी देण्यात येते आहे. त्यामुळे ज्या अधिकारी/कर्मचारी यांना वेतनवाढी अदा केलेल्या आहेत त्यांची वसुली करण्यात येवू नये. अशी संधी ही सोबतचे शपथपत्र नमुना 'अ' हे आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे लेखी दिल्यानंतरच लागू राहील.

तसेच प्रस्तुत परिपत्रक दर सहा महीण्यांनी आस्थापनेवरील सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे, आणि मराठी / हिंदी भाषा उतीर्ण होणे ही अधिकारी / कर्मचाऱ्याची वैयक्तीक जबाबदारी असल्याची जाणीवही करुन देण्यात यावी.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने,

(धिरजकुमार रा. कदम)

कुलसचिव

विद्यापीठ परिपत्रक दिनांक २७/०३/२०२३ नुसार एतदर्थ मंडळाची हिंदी/मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्याकरीता दिलेल्या मुदतवाढीबाबत घ्यावयाचे शपथपत्र

---

# वचननामा/शपथपत्र – 'अ'

******************************************

मी श्री/श्रीमती ----------------------------------------------------

पदनाम-----------------कार्यालय------------ --------------------------- वचननामा लिहून देतो की, माझा/माझी प्रथम नियूक्ती या पदावर---------------------- झालेली असून मी दिनाक ------------रोजी रूजू झालो/झाली, विद्यापीठ परिपत्रक दिनांक २७/०३/२०२३ नुसार दिलेल्या मुदतवाढीत स्वत:ची वैयक्तीक जबाबदारी समजून एतदर्थ मंडळाची हिंदी/मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होईल, जर मी दिलेल्या मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास मला भविष्यातील मिळणाऱ्या वेतनवाढी थांबविण्यात येवून पुर्वी अदा करण्यात आलेल्या वेतनवाढीची वसुली केल्यास माझा/माझी काहीही हरकत राहणार नाही किंवा अशा उदभलेल्या प्रकरणी मी कसलाही दावा करणार नाही. आणखी असेही लिहून देतो की, सदरील कार्यकारी परिषद ठराव क्र-४८/२०९/१६.०२.२०२३ दिनांक १६/०२/२०२३ जर लेखा परिक्षणामध्ये आक्षेप निघाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ही माझी राहील त्यावेळी जे काही शासन/ विद्यापीठाने दिलेले आर्थिक लाभ वसुलीयोग्य ठरल्यास ते मी परत करण्यास बांधिल राहील.

स्वाक्षरी---------------------------

पुर्णनाव---------------------------